**PRESS RELEASE**

**RESERVE BANK OF INDIA**

**PRESS RELATIONS DIVISION**, Central Office, Post Box 406, Mumbai 400001
Phone: 2266 0502 Fax: 2266 0358, 2270 3279

www.rbi.org.in
www.rbi.org.in\hindi
e-mail: helpprd@rbi.org.in

एप्रिल १७, २००४

## भारतीय रिझर्व्ह बँकेने अनिवासी भारतीयांच्या ठेव योजनांचे सुसूत्रीकरण केले

अनिवासी भारतीयांच्या प्रचलित ठेव योजनांच्या पुनरावलोकनानंतर खालील उपाययोजनांची ताबडतोब अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे :

**(i) एनआरई मुदत ठेवींवरील व्याजाच्या दरावर कमाल मर्यादा**

आता असे ठरविण्यात आले आहे की पुढील सूचना मिळेपर्यंत, एप्रिल १७, २००४ रोजी भारतातील व्यवहार संपण्याच्या वेळेपर्यंत कॉंट्रॅक्ट करण्यात आलेल्या एक ते तीन वर्षे मुदतीच्या अनिवासी (बाह्य) (एनआरई) च्या रुपयांमधील ठेवींवरील व्याज दर हे अशाच मुदतीच्या अमेरिकन डॉलर साठीच्या एल आय बी ओ आर/ एस डब्ल्यू ए पी दरांपेक्षा जास्त असू नयेत.

तीन वर्षे मुदतीच्या ठेवींसाठी वरील प्रमाणे ठरविण्यात आलेले व्याजदर हे, मुदत तीन वर्षांपेक्षा जास्त असल्यासही लागू होतील. व्याजाच्या दरातील बदल हे सध्याच्या मुदतीनंतर नूतनीकृत केलेल्या एनआरई ठेवींनासुद्धा लागू होतील.

अनिवासी भारतीयांना देऊ केलेल्या व्याज दरांमध्ये सातत्य आणण्यासाठी जुलै १७, २००३ पासून एनआरई च्या ठेवींवरील व्याज दर अमेरिकन डॉलर साठीच्या एलआयबीओआर/ एस डब्ल्यू ए पी दरांशी जोडण्यात आले. जुलै १७, २००३ च्या, समान मुदतीच्या, एलआयबीओआर/ एस डब्ल्यू ए पी दरांपेक्षा २५० बेसिस पॉइंट्स जास्त असलेले या ठेवींवरचे व्याज दर, सप्टेंबर १५, २००३ रोजी समान मुदतीच्या एल आय बी ओ आर / एस डब्ल्यू ए पी दरांपेक्षा १०० बेसिस पॉइंट्स अधिक, इतके कमी करण्यात आले, व नंतर ऑक्टोबर १८, २००३ रोजी ते समान मुदतीच्या एल आय बी ओ आर / एस डब्ल्यू ए पी दरांपेक्षा २५ बेसिस पॉइंट्स अधिक इतके कमी करण्यात आले.

**(ii) एन आर ई बचत ठेवींवरीत व्याजाचे दर :-**

एन आर ई ठेवींच्या विविध प्रकारांवरील व्याज दरांमध्ये समस्तरता आणण्याच्या दृष्टीने असे ठरविण्यात आले आहे की एप्रिल १७, २००४ रोजी भारतातील व्यवहार बंद होण्याच्या वेळेपासून एन आर ई बचत ठेवींवरील व्याजदरही एलआयबीओआर / एस डब्ल्यू ए पी दरांशी जोडले जातील. एन आर ई बचत ठेवींवरील व्याजदर हे अमेरिकन डॉलर मधील ठेवींवरील सहा महिने मुदतीच्या एल आय बी ओ आर/ एस डब्ल्यू ए पी दरांपेक्षा अधिक असू नयेत. एन आर ई बचत ठेवींवरील व्याज दर हे प्रत्येक तिमाहीला, अमेरिकन डॉलरच्या एलआयबीओआर / एसडब्ल्यूएपीच्या आधीच्या तिमाहीच्या शेवटच्या कार्यदिनी असलेल्या दराच्या आधारावर ठरविले जाऊ शकतील. एप्रिल-जून २००४ या तिमाहीसाठी, मार्च २००४ च्या शेवटच्या कार्यदिनी असलेला, अमेरिकन डॉलरचा एलआयबीओआर / एस डब्ल्यू ए पी दर लागू असेल.

सध्या एनआरई बचत ठेवींचा व्याज दर हा स्थानिक बचत ठेवींच्या व्याज दराशी जोडलेला आहे, तर एनआरई मुदत ठेवींवरील व्याजदर, हे जुलै १७, २००३ पासून अमेरिकन डॉलरचा एलआयबीओआर/एसडब्ल्यूएपी दरांशी जोडलेले आहेत.

**(iii) एन आर ई बचत ठेवींपोटी ऊचल :**

असे आदेश देण्यात येत आहे की, खातेधारक, त्याच्या बचत ठेवी कोणत्याही वेळी काढू शकत असल्यामुळे या ठेवींपोटी बँकांनी कोणत्याही प्रकारे प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष पुनर्ग्रहणाधिकार (लीएन) लावू नये.

**अल्पना किल्लावाला**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस रिलीज : २००३-२००४/१२३५**